# नियमित दिवाणी दावा क्र. ९९/२०१३ मध्ये निशाणी क्र. ५७ व ५८ चे अर्जांवरील संयुक्त आदेश

वादींतर्फे सदरचे अर्ज हे वादी क्र. १ हा दिनांक १३.११.२०१९ रोजी मयत झाला असल्याने त्याचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ होऊन, दावा अवसान पावल्याबाबतचा आदेश रद्दबातल करणेत येऊन त्याचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता परवानगी मिळण्याकरिता दाखल केले आहेत.

२) वादींचे सदर अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादी क्र. १ सिद्धाप्पा हादीमनी हा दि. १३.११.२०१९ रोजी मुचंडी या गांवी मयत झाला आहे. त्याचे मृत्यूमुळे त्याची मुले दुःखात होती. त्यांना सावरण्यासाठी थोडा कालावधी गेला. दरम्यान कोरोनाची साथ फैलावल्यामुळे न्यायालयाचे कामकाज ही अंशतः थांबले होते. तसेच ग्रामपंचायत मधून वादी क्र. १ चा मृत्यू दाखलाही वेळेत मिळाला नाही. त्यामुळे वादींना वारस अभिलेखावर आणता आलेले नाहीत. त्यामुळे वादी क्र. १ बाबत दावा अवसान पावला आहे. सबब वर नमूद कारणांमुळे वादींविरूद्ध वादी क्र. १ बाबत दावा अवसान पावल्याचा आदेश रद्दबातल करून व वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येऊन वादींनी नि. क्र. ५७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वादी क्र. १ चे असणारे वारस यांना अभिलेखावर आणण्यासाठी परवानगी देणे जरूरीचे आहे अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली आहे.

३) प्रतिवादींतर्फे सदर अर्जांवर योग्य ते न्यायाचे आदेश पारीत करण्यात यावेत असे म्हणणे दाखल करण्यात आले आहे.

४) अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दावा, कैफियत व सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) दावा स्थावर मिळकतींचे वाटप व कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. वादी क्र. १ मयत असल्याची बाब प्रतिवादींनी नाकारलेली नाही. त्याचबरोबर विलंब माफीच्या अर्जातील कथने संयुक्तिक आहेत. तसेच दावा स्थावर मिळकतीमधील हक्क व हितसंबंधाबाबतचा असल्याने मयत पक्षकाराच्या वतीने त्याचे वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी, वाद विषयांची अनेकता टाळण्यासाठी तसेच प्रकरणातील गुंतागुंत टाळण्यासाठी वारस अभिलेखावर घेणेकरिता परवानगी देणे न्यायाचे व गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, वादी क्र. १ चे बाबत दावा अवसान पावल्याचा आदेश रद्दबातल करून त्याचे वारसांना अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करून वारस अभिलेखावर घेण्यासाठी परवानगी मिळण्यासाठीचे सादर केलेले सदरचे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज नि.क्र. ५७ व ५८ मंजूर करण्यात येत आहेत.

२. वादीतर्फे वारसांना मयत वादी क्र. १ चे नि. क्र. ५७ वरील अर्जात नमूद केल्याप्रमाणे असणारे वारस म्हणजेच मयत

वादीची पत्नी श्रीमती सुशिला सिद्धाप्पा हादीमनी, मुलगे श्री. सुर्यकांत सिद्धाप्पा हादीमनी व चंद्रकांत सिद्धाप्पा हादीमनी आणि मुलगी सौ. सुनिता सुभाष पोलिसी यांना वादी क्र. १ बाबत दावा अवसान पावल्याचा आदेश रद्दबातल करण्यात येऊन, वारसांना अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करून अभिलेखावर घेण्याकरिता परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्याकरिता आवश्यक त्या दुरुस्त्या मूळ दाव्यामध्ये विहित कालावधीमध्ये कराव्यात असे वादींना निर्देशित करण्यात येत आहे.

४. सदर संयुक्त आदेशाची नोंद अर्ज निशाणी क्र. ५८ वर घेण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

स्थळ:- जत
दिनांक :-१७.०१.२०२२.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मुळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १७/०१/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १७/०१/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १८/०१/२०२२. |